जनसंपर्क कक्ष
10 JAN 2018 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिग्दर्शक भालकर यांच्यासह नऊ जणांची सिनेटवर निवड



कोल्हापूर : विद्यापीठ अधिसभेवर नियुक्ती झालेले पत्र दिग्दर्शक यशवंत भालकर यांना देताना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे सदस्यांना आमंत्रित करूण निवडीचे पत्र देण्यात आले.

प्रतिनिधी

कोल्हापूर

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ ची अंमलबजावणी १ मार्चपासून सर्वच विद्यापीठांनी केली आहे. या कायद्यानुसार शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळाची निवडणूक १७ नोव्हेंबर रोजी झाली. या निवडणुकीचा निकाल २० नोव्हेंबर रोजी लागला. त्यानंतर राज्यपाल नियुक्त अधिसभा सदस्यांच्या नियुक्तीकडे विद्यापीठ वर्तुळाचे लक्ष लागले होते. मंगळवारी ही प्रतीक्षा संपली. कोल्हापूरचे ज्येष्ठ दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्यासह ९ सदस्यांची नियुक्ती विद्यापीठ अधिसभेवर (सिनेट) करण्यात आली.

नवीन विद्यापीठ कायद्यानुसार विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणारयांच्या ज्ञान आणि अनुभवाचा फायदा विद्यापीठ आणि विद्यार्थ्यांना व्हावा, यासाठी विविध क्षेत्रातील ९ व्यक्तींची सिनेटवर निवड करण्यात आली आहे. यामध्ये कला विभागातून ज्येष्ठ दिग्दर्शक यशवंत भालकर, शिक्षण विभागातून प्रा. शंकरराव कुलकर्णी (कोल्हापूर), विधि विभागातून ॲड. जगदीश पाटणे (वाई), कृषी विभागातून प्रताप चिपळुणकर (कोल्हापूर), बँकींग विभागातून संजय परमाणे (सांगली), महिला विभागातून नसिमा हुरजूक (कोल्हापूर), उद्योग क्षेत्रातून अजित पाटील (कोल्हापूर), विज्ञान क्षेत्रातून शिरीष काळे (भाभा अणुसंशोधन केंद्र, मुंबई) आणि नंदकुमार दिवटे (कोल्हापूर) यांची नियुक्ती केली आहे. मंगळवारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या कार्यालयात नवनियुक्त सदस्यांना आमंत्रित करूण निवडीचे पत्र देण्यात आले.

### कुलगुरू नियुक्त सदस्यांची विद्यापीठ वर्तुळाला प्रतीक्षा

कुलगुरू नियुक्त सदस्यांमध्ये जिल्हा परिषद १, नगरपालिका १, कॉलेज शिक्षकेत्तर कर्मचारी १, विद्यापीठ शिक्षकेत्तर कर्मचारी १ अशा नेमणुका केल्या जाणार आहेत. कुलगुरू नियुक्तीवर कोणाची वर्णी लागणार याकडे विद्यापीठ वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### ...आता लक्ष व्यवस्थापन परिषदेच्या निवडणुकीकडे

सिनेटमधून व्यवस्थापन परिषदेची रचना केली जाते. त्यामुळे व्यवस्थापन परिषदेवर आपलीच वर्णी लागावी यासाठी आघाडी प्रमुखांकडे फिल्डिंग लावली जात आहे. या निवडीमध्ये प्राचार्य २, प्राध्यापक २, मॅनेजमेंट २, पदवीधर २, पदवीधर शिक्षक १, कॉलेज शिक्षक १, पदव्युत्तर शिक्षक १ आदी गटातून निवड केली जाणार आहे. त्यामुळे आता व्यवस्थापन परिषदेकडे विद्यापीठ परिक्षेत्राचे लक्ष लागले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2018
सकाळ

# प्रा. शंकरराव कुलकर्णींसह भालकर, हुरजूक अधिसभेवर

## राज्यपालांकडून नियुक्ती : 'सकाळ'च्या दिवटे यांचाही समावेश

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेवर कुलपतींकडून विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या नऊ जणांची सदस्यपदी निवड करण्यात आली. त्याबाबतचे पत्र त्यांना विद्यापीठ प्रशासनाकडून आज देण्यात आले.

कुलपतींकडून जाहीर होणाऱ्या विविध क्षेत्रांतील व्यक्तींच्या नावांची विद्यापीठ वर्तुळात उत्सुकता होती. या व्यक्तींच्या ज्ञान व अनुभवाचा फायदा



विद्यापीठ आणि विद्यार्थ्यांना व्हावा, या उद्देशाने त्यांना अधिसभेवर घेण्यात आले आहे. शिक्षण विभागातून प्रा. शंकरराव कुलकर्णी, कला विभागातून ज्येष्ठ दिग्दर्शक यशवंत भालकर, विधी विभागातून डॉ. जगदीश पाटणे, कृषी विभागातून प्रताप चिपळूणकर, बँकिंग विभागातून संजय परमाणे, महिला विभागातून नसीमा हुरजूक, उद्योग क्षेत्रातून अजित पाटील, विज्ञान क्षेत्रातून शिरीष काळे व नंदकुमार दिवटे यांची अधिसभा सदस्यपदी निवड झाली आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी त्यांना निवड पत्रे दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2018
महाराष्ट्र टाईम्स

# सिनेटवर नऊ जणांची राज्यपालांकडून नियुक्ती

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठ अधिसभा आणि अधिकार मंडळावर (सिनेट) कुलपती राज्यपाल सी विद्यासागर राव यांच्याकडून नियुक्त केल्या. जाणाऱ्या सदस्यांची नावे मंगळवारी सायंकाळी जाहीर करण्यात आली. यामध्ये नऊ सदस्यांचा समावेश आहे. यामध्ये ज्येष्ठ दिग्दर्शक यशवंत भालकर, सामाजिक कार्यकर्त्या नसीमा हूरजूक आदींचा समावेश आहे.

**विद्यापीठाकडून अधिकृत निवडीचे पत्र**

नवीन विद्यापीठ कायद्यानुसार शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा आणि अधिकार मंडळासाठी १७ नोव्हेंबर रोजी सिनेटसाठी मतदान घेऊन सदस्यांची निवड करण्यात आली होती. तर आता विविध क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या नऊ व्यक्तींची सिनेट सदस्यपदी कुलपतींकडून निवड करण्यात आली. त्या बाबतचे पत्र विद्यापीठाकडून मंगळवारी देण्यात आले.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचे ज्ञान आणि अनुभवाचा फायदा विद्यापीठ आणि विद्यार्थ्यांना व्हावा यासाठी कुलपतींकडून नऊ व्यक्तींची सिनेटवर निवड करण्यात आली आहे. यामध्ये कला विभागातून चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर, शिक्षण विभागातून शंकरराव कुलकर्णी, विधी विभागातून जगदीश पाटणे, कृषी विभागातून प्रताप चिपळूणकर, बँकिंग विभागातून संजय परमाणे, महिला विभागातून नसीमा हुरजूक, उद्योग क्षेत्रातून अजित पाटील, विज्ञान क्षेत्रातून शिरीष काळे आणि नंदकुमार दिवटे यांचा समावेश आहे.

मंगळवारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या कार्यालयात सिनेटसदस्यपदी नियुक्ती झालेल्या व्यक्तींना आमंत्रित करून या बाबतचे पत्र देण्यात आले.

10 JAN 2018

जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलपतींकडून नऊजणांची सिनेटवर निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : नवीन विद्यापीठ कायद्यानुसार शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा आणि अधिकार मंडळासाठी दि. १७ नोव्हेंबरला सिनेटसाठी मतदान घेऊन सदस्यांची निवड केली होती. तर आता विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या नऊ व्यक्तींची सिनेट सदस्यपदी कुलपतींकडून निवड करण्यात आली. त्याबाबतचे पत्र विद्यापीठास मंगळवारी देण्यात आले.

कुलपतींकडून विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्यांच्या ज्ञान आणि अनुभवाचा फायदा विद्यापीठ आणि विद्यार्थ्यांना व्हावा यासाठी नऊ व्यक्तींची सिनेटवर निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये कला विभागातून यशवंत भालकर, शिक्षण विभागातून शंकरराव कुलकर्णी, विधी विभागातून अ‍ॅड. जगदीश पाटणे, कृषी विभागातून प्रताप चिपळूणकर, बँकिंग विभागातून संजय परमाणे, महिला विभागातून नसिमा हुरजूक, उद्योग क्षेत्रातून अजित पाटील, विज्ञान क्षेत्रातून शिरीष काळे अणि नंदकुमार दिवटे यांचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2018
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या सिनेटवर ९ जणांची नियुक्ती

**कोल्हापूर :** नवीन विद्यापीठ कायद्यानुसार शिवाजी विद्यापीठाच्या सिनेटवर विविध क्षेत्रांतील नऊ मान्यवरांची सदस्य म्हणून कुलपतींकडून निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र विद्यापीठ प्रशासनास आज प्राप्त झाले. यामध्ये कला विभागातून सिनेदिग्दर्शक यशवंत भालकर, शिक्षण विभागातून शंकरराव कुलकर्णी, विधी विभागातून डॉ. जगदीश पाटणे, कृषी विभागातून प्रताप चिपळूणकर, बँकिंग विभागातून संजय परमाणे, महिला विभागातून हेल्पर्स ऑफ द हॅन्डीकॅप संस्थेच्या नसीमा हुरजूक, उद्योग क्षेत्रातून उद्योजक अजितकुमार पाटील, विज्ञान क्षेत्रातून शिरीष काळे आणि नंदकुमार दिवटे आदींचा समावेश आहे. या सर्व मान्यवरांना मंगळवारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या कार्यालयात आमंत्रित करून निवडीचे पत्र देण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2018
पुण्यनगरी

# सिनेटवर नऊ जणांची नियुक्ती

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** नवीन विद्यापीठ कायद्यानुसार शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा आणि अधिकार मंडळासाठी दि. १७ नोव्हेंबर रोजी मतदान घेऊन सदस्यांची निवड करण्यात आली होती, तर आता विविध क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या ९ व्यक्तींची सिनेटच्या सदस्यपदी कुलपतींकडून निवड करण्यात आली. त्याबाबतचे पत्र विद्यापीठाकडून मंगळवारी संबंधितांना देण्यात आले. विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्यांच्या ज्ञान आणि अनुभवाचा फायदा विद्यापीठ आणि विद्यार्थ्यांना व्हावा यासाठी या निवडी करण्यात आल्या आहेत. यामध्ये कला विभागातून यशवंत भालकर, शिक्षण विभागातून शंकरराव कुलकर्णी, विधी विभागातून ॲड. जगदीश पाटणे, ▶▶ पान ७ वर

# सिनेटवर नऊ जणांची नियुक्ती

**(पान १ वरून)** कृषी विभागातून प्रताप चिपळूणकर, बँकिंग विभागातून संजय परमाणे, महिला विभागातून नसीमा हुरजूक, उद्योग क्षेत्रातून अजित पाटील, विज्ञान क्षेत्रातून शिरीष काळे अणि नंदकुमार दिवटे यांचा समावेश आहे. मंगळवारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या कार्यालयात या व्यक्तींना आमंत्रित करून याबाबतचे पत्र देण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 0 JAN 2018
महाराष्ट्र टाईम्स

# माजी कुलगुरूंच्या स्मृतींना उजाळा

कोल्हापूर टाइम्स टीम



'शिवाजी विद्यापीठाने यंदा आपल्या साऱ्या पूर्वसुरींचे स्मरण करणारी दिनदर्शिका व दैनंदिनी तयार केली आहे. त्या माध्यमातून वर्षभर त्यांच्या स्मृती जागत्या राहतील,' अशी भावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठाची २०१८ची दिनदर्शिका व दैनंदिनीचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'दिनदर्शिकेच्या माध्यमातून विद्यापीठास लाभलेल्या सर्व माजी कुलगुरूंचे स्मरण करण्याचा व त्यांच्या स्मृती कायमस्वरुपी जतन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. दररोज त्यांचे दर्शन घडत राहिल्याने आपल्याला त्यातून त्यांच्याप्रमाणेच चांगल्या कामाची प्रेरणा मिळत राहील.'

शिवाजी विद्यापीठाला गेल्या ५५ वर्षांत डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यापासून ते डॉ. देवानंद शिंदे यांच्यापर्यंत एकूण बारा कुलगुरू लाभले. या बारा कुलगुरूंची पोर्ट्रेट्स २०१८च्या दिनदर्शिकेत वापरण्यात आली आहेत. दैनंदिनीमध्येही दर महिन्याला एक याप्रमाणे ही पोर्ट्रेट वापरण्यात आली असून दैनंदिनीच्या मुखपृष्ठावर विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन झाले, त्या दिवशीचे (दि. २३ एप्रिल १९७१) छायाचित्र तर मलपृष्ठावर विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण झाले, त्या दिवशीचे (दि. १ डिसेंबर १९७४) छायाचित्र वापरण्यात आले आहे.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2018
पुढारी

# विद्यापीठात दिनदर्शिका, दैनंदिनीचे प्रकाशन

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाने यंदा आपल्या साऱ्या पूर्वसुरींचे स्मरण करणारी दिनदर्शिका व दैनंदिनी तयार केली असून, त्या माध्यमातून वर्षभर त्यांच्या स्मृती जागत्या राहतील, अशी भावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी येथे व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठाची सन २०१८ची दिनदर्शिका व दैनंदिनीचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, दिनदर्शिकेच्या माध्यमातून विद्यापीठास लाभलेल्या सर्व माजी कुलगुरूंचे स्मरण करण्याचा व त्यांच्या स्मृती कायमस्वरूपी जतन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. दररोज त्यांचे दर्शन घडत राहिल्याने आपल्याला त्यातून त्यांच्याप्रमाणेच चांगल्या कामाची प्रेरणा मिळत राहील.

यावेळी जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांनी प्रास्ताविकात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या संकल्पनेतून दिनदर्शिका व दैनंदिनी साकार झाली असल्याचे सांगितले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्रि-आयएएस ट्रेनिंग सेंटरच्या संचालक डॉ. अंजली पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, डॉ. पी. एस. पाटील आदी उपस्थित होते.

1 0 JAN 2018

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'रोजगार निर्मितीस प्राधान्य देणारा अर्थसंकल्प असावा'

**प्रतिनिधी , कोल्हापूर**

**देशाचा आर्थिक** विकास हा रोजगार दरावर अवलंबून असतो. सद्य काळातील रोजगाराची स्थिती विचारात घेता आगामी २०१८-१९ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प हा उत्पादक अशा रोजगार निर्मिती क्षेत्रास प्राधान्य देणारा असावा, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व राज्य नियोजन आयोगाचे माजी सदस्य प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचे बँक ऑफ इंडिया चेअर इन रूरल बँकिंग आणि अर्थशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अर्थसंकल्प पूर्व चर्चासत्र २०१८ या विषयावर आज एकदिवसीय कार्यशाळा झाली. या वेळी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. पाटील बोलत होते. अध्यक्षीय भाषणात कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी शिक्षण व संशोधन क्षेत्रात सरकारने अधिकाधिक भर देण्याबरोबर शिक्षण क्षेत्र करमुक्त करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांनी महिला सबलीकरण धोरणाच्या माध्यमातून अर्थव्यस्थेतील लिंग तफावत दूर करण्यासाठी सरकारने अर्थसंकल्पात त्याप्रकारची तरतूद करावी, असे संगितले. सुरेंद्र जैन यांनी जीएसटी व उद्योग क्षेत्र यांची तुलनात्मक मांडणी केली.

मनीष झंवर यांनी कृषी विकासासाठी भागीदारी शेतीची आवश्यकता स्पष्ट केली. डॉ. ए. आर. पडोशी यांनी विकास आणि रोजगार यांचा परस्परसंबंध व त्यांची सर्वसमावेशक वृद्धीतील भूमिका स्पष्ट केली. महेश शिंदे यांनी कर संरचना, शाश्वत विकास यांचा आर्थिक दृष्टिकोनातून आढावा घेतला.

डॉ. ककडे यांनी प्रास्ताविक केले. सहायक प्राध्यापक एस. पी. पंचगल्ले यांनी सूत्रसंचालन केले तर सहायक प्राध्यापक एस. टी. कोंबडे यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

**प्रत्यक्ष अनुभवातून पत्रकारिता बहरते**

विद्यापीठातील विद्यार्थी मेळाव्यात राही भिडे यांचे प्रतिपादन




10 JAN 2018

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रत्यक्ष अनुभवातूनच पत्रकारिता बहरते

## राही भिडे : शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन, वृत्तपत्रविद्या, संवादशास्त्र विभागातर्फे पत्रकार दिन, विद्यार्थी मेळावा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** नव्याने पत्रकारितेमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिकण्याच्या अमर्याद संधी उपलब्ध आहेत. नवीन पत्रकारांनी स्वतः फिल्डवर जाऊन अनुभव घेतले पाहिजेत. विविध ठिकाणी जाऊन घेतलेल्या अनुभवांमुळेच पत्रकारिता बहरते, असे प्रतिपादन दै. 'पुण्यनगरी'च्या मुख्य संपादक राही भिडे यांनी केले. त्या शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागातर्फे आयोज़ित पत्रकार दिन व ग्रामीण पत्रकारिता विद्यार्थी मेळाव्यात बोलत होत्या.

राही भिडे म्हणाल्या, आजही महिला पत्रकारांची संख्या कमी आहे; पण महिला पत्रकारांना नेहमीच सन्मानाची वागणूक मिळते. उमेदीच्या काळात शिकण्याची संधी मिळत असते. या काळापासून 'विश्वासार्हता, पारदर्शकता आणि गोपनीयता' या त्रिसूत्रीचा अवलंब केल्यास पत्रकारितेत यश नक्कीच मिळते. लिखानात सातत्य हवे, सातत्य ठेवल्यास स्वतःचा विकास होऊ लागतो.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग आणि वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागातर्फे आयोजित पत्रकार दिन व ग्रामीण पत्रकारिता विद्यार्थी मेळाव्यात बोलताना दै. 'पुण्यनगरी'च्या मुख्य संपादक राही भिडे. सोबत डॉ. निशा पवार, रत्नाकर पंडित आदी. (छाया : एस. अली)

वृत्त वाहिन्या आणि समाज माध्यमे बातम्या देत असतात. त्यामुळे वाचकांना सर्व घटना समजलेल्या असतात. अशा वेळी त्याच बातम्या वृत्तपत्रात देण्यापेक्षा बातमीमागची बातमी द्यायला हवी अथवा त्याचे होणारे परिणाम किंवा त्या घटनेचे विश्लेषण वर्तमानपत्रातून दिले गेले पाहिजे.

सध्याची तरुणाई फार सजग आहे. आपल्याला हवा असलेला बदल ती घडवेल. त्यासाठी समाज माध्यमाचे हत्यार त्यांच्या हातात आहे. त्याचा योग्य वापर केल्यास परिस्थिती बदलण्यास ही माध्यमे साहाय्यभूत ठरतील. जोखीम पत्करून पत्रकाराने काम केले पाहिजे. योग्य वेळी योग्य जोखीम घेतल्यास करिअरचा आलेख उंचावत जाईल. त्यांनी आपल्या आजवरच्या कारकीर्दीमध्ये आलेले विविध अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले.

यावेळी आपल्या मनोगतामध्ये डॉ. सुमन बुवा यांनी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष रत्नाकर पंडित यांनी पत्रकारितेतील संधी आणि आव्हानांची माहिती दिली. कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक डॉ. निशा पवार यांनी केले, तर आभार डॉ. शिवाजी जाधव यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2018
महाराष्ट्र टाईम्स

# 'ज्ञान निर्मितीचे केंद्र स्त्रियांनी बनावे'

**म. टा. वृत्तसेवा, शिराळा**



डॉ. प्रकाश पवार

'सावित्रीबाई फुले यांच्या कल्पनेतील भारत अस्तित्वात येण्यासाठी स्त्रियांनी ज्ञान निर्मितीचे केंद्र बनले पाहिजे,' असे मत प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी व्यक्त केले. चिखली (ता. शिराळा) येथील देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक महाविद्यालय आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सावित्रीबाई फुले स्मृती व्याख्यानमालेत सावित्रीबाई फुले आणि भारतीय स्वातंत्र्याची सत्तर वर्ष, या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य, डॉ. एस. आर. पाटील होते. संस्थेचे अध्यक्ष अमरसिंह नाईक उपस्थित होते.

डॉ. पवार म्हणाले, 'फुले दाम्पत्याचे नाते हे समतेचे आणि मानवतेचे होते. अंतप्रेरणेतून निर्माण झालेल्या विचाराशी आणि कार्याशी त्यांनी कधी प्रतारणा केली नाही. जोपर्यंत पुरुषांना महिला होता येत नाही आणि महिलांना पुरुषत्व सिद्ध करता येत नाही तोपर्यंत समानता येणार नाही. भारतातील निम्मी लोकसंख्या महिलांची आहे, पण तितके प्रतिनिधित्व त्यांना मिळाले नाही. भारतीय स्वातंत्र्याला सत्तर वर्षे झाली तरी सावित्रीबाई फुलेंचे विचार देशाचा अजेंडा म्हणून पेलवत नाहीत. इतिहासात स्त्रीचं कर्तृत्व सिद्ध करायचे असल्यास स्त्रियांनीच आता सक्षम बनले पाहिजे.'

स्वागत व प्रास्ताविक डॉ. प्रकाश दुकळे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. एम. एम. सूर्यवंशी यांनी करून दिली. सूत्रसंचलन डॉ. नीता जोखे यांनी तर आभार डॉ. रेखा देवकर यांनी मानले.

1 0 JAN 2018

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्राध्यापक होण्यासाठी सेट-नेट हा गेटपास

## एम. ए. अणुसे : शिवाजी विद्यापीठात दोनदिवसीय मार्गदर्शन कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर** : वाढत्या आणि बदलत्या स्पर्धात्मक युगात शैक्षणिक क्षेत्रामध्ये महाविद्यालयीन शिक्षक होण्यासाठी सेट-नेट होणे हाच एकमेव गेटपास आहे, असे प्रतिपादन दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अणुसे यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राच्यावतीने आयोजित दोन दिवसीय सेट-नेट परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी बोलत होते.

डॉ. अणुसे म्हणाले की, परीक्षाभिमुख अभ्यासामध्ये सातत्य ठेवल्यास परीक्षेत यश हमखास मिळू शकते. अभ्यासात सातत्य टिकविण्यासाठी वेळेचे व्यवस्थापन करताना अभ्यासक्रमातील कोणत्या घटकाला किती महत्त्व, त्यासाठी कोणत्या लेखकाची कोणती पुस्तके कशी वाचणे या गोष्टीला सर्वांत जास्त महत्त्व आहे.

सकाळच्या सत्रामध्ये डॉ. मारुती लोंढे, यांनी सेट-नेटसारख्या परीक्षेमध्ये आशयापेक्षा तंत्रपद्धतीला सर्वांत जास्त महत्त्व आहे आणि ते विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे. गणितांच्या उदाहरणांना न घाबरता त्याचा सराव केला म्हणजे गणितातील जादू वा गंमती विद्यार्थ्यांची अभ्यासातील ताणही कमी करतो.

डॉ. के. बी.. पाटील, यांनी सेट-नेट संदर्भातील कार्यशाळा म्हणजे परीक्षेची पूर्ण तयारी नसून, तर ती केवळ सुरुवात आहे. सरावातील सातत्यच विद्यार्थ्यांना सेट-नेट परीक्षेसाठी महत्त्वाचे ठरू शकते. अपयशाने खचून न जाता पुन्हा अभ्यासाची तयारी महत्त्वाची आहे.'

दुपारच्या सत्रामध्ये डॉ. रूपाली संकपाळ यांनी परिमाणकारक वर्ग संप्रेषणासाठी शिक्षकांनी विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानावा, असे सांगून मानसशास्त्रीयदृष्टीने शिक्षक स्वतः मानसिकदृष्ट्या सक्षम असल्यास तो विद्यार्थ्यांना सकारात्मक अध्ययनासाठी प्रोत्साहन प्रेरणा देऊ शकतो. त्याचबरोबर परिमाणकारक अध्ययनासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे. शिक्षणशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. विद्यानंद खंडागळे यांनीही मार्गदर्शन केले.

सुमारे २०० विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला होता. तेजस्विनी आळवेकर, शुभांगी उदाळे व क्रांती कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यशाळेसाठी दूर शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव कॅप्टन डॉ. एन. पी. सोनजे, समन्वयक दत्तात्रय कमलाकर, डॉ. नितीन रणदिवे, प्रवीण लोंढे, डॉ. सूर्यकांत गायकवाड, महेश चव्हाण, विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, आदी उपस्थित होते.

1 0 JAN 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षकासाठी सेट-नेट हाच गेटपास

## प्रा. डॉ. एम. ए. अनुसे : दूर शिक्षण केंद्रातर्फे मार्गदर्शन कार्यशाळा



कोल्हापूर, ता. ९ : बदलत्या स्पर्धात्मक शैक्षणिक क्षेत्रात महाविद्यालयीन शिक्षक होण्यासाठी सेट-नेट होणे हाच एकमेव गेटपास आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे यांनी केले. ते दूर शिक्षण केंद्रातर्फे आयोजित दोन दिवसीय सेट-नेट परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी बोलत होते.

डॉ. अनुसे म्हणाले, "परीक्षाभिमुख अभ्यासात सातत्य ठेवल्यास परीक्षेत यश हमखास मिळू शकते. अभ्यासात सातत्य टिकविण्यासाठी वेळेचे व्यवस्थापन करताना अभ्यासक्रमातील कोणत्या घटकाला किती महत्व, त्यासाठी कोणत्या लेखकाची कोणती पुस्तके कशी वाचावीत, याला महत्त्व आहे."

डॉ. मारुती लोंढे म्हणाले, "सेट-नेट सारख्या परीक्षेत आशयापेक्षा तंत्र पद्धतीला महत्त्व आहे. ते विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे. गणितांच्या उदाहरणांना न घाबरता त्याचा सराव करावा म्हणजे गणितातील गंमती विद्यार्थ्यांचा अभ्यासातील ताण कमी करतील." डॉ. के. बी. पाटील म्हणाले, "सेट-नेट संदर्भातील कार्यशाळा म्हणजे परीक्षेची पूर्ण तयारी नसून, तर ती केवळ सुरुवात आहे. सरावातील सातत्यच विद्यार्थ्यांना सेट-नेट परीक्षेसाठी महत्त्वाचे ठरू शकते." डॉ. रुपाली संकपाळ यांनी परिणामकारक वर्ग संप्रेषणसाठी शिक्षकांनी विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानावा, असे सांगून मानसशास्त्रीय दृष्टीने शिक्षक स्वतः मानसिकदृष्ट्या सक्षम असल्यास तो विद्यार्थ्यांना सकारात्मक अध्ययनसाठी प्रोत्साहन देऊ शकतो, असे सांगितले.

शिक्षणशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मुक्त शैक्षणिक स्रोताबद्दलची अद्ययावत माहिती देऊन सेट-नेट परीक्षेसाठी येणाऱ्या संक्षिप्त रूपावरील प्रश्नांची सविस्तर माहिती दिली. दूर शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव डॉ एन. पी. सोनजे, समन्वयक दत्तात्रय कमलाकर, डॉ. नितीन रणदिवे, प्रवीण लोंढे, डॉ. सूर्यकांत गायकवाड, महेश चव्हाण उपस्थित होते. तेजस्विनी आळवेकर, शुभांगी उदाळे व क्रांती कांबळे यांनी सूत्रसंचालन केले.

10 JAN 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालयीन शिक्षक होण्यासाठी सेट-नेट होणे हा गेटपास

## प्रा. एम. ए. अनुसे : विद्यापीठात सेट-नेट परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचा समारोप

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वाढत्या आणि बदलत्या स्पर्धात्मक युगात शैक्षणिक क्षेत्रामध्ये महाविद्यालयीन शिक्षक होण्यासाठी सेट-नेट होणे हाच एकमेव गेटपास आहे, असे प्रतिपादन दूर शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ एम. ए. अनुसे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित दोनदिवसीय सेट - नेट परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. अनुसे म्हणाले, परीक्षाभिमुख अभ्यासामध्ये सातत्य ठेवल्यास परीक्षेत यश हमखास मिळू शकते. अभ्यासात सातत्य टिकविण्यासाठी वेळेचे व्यवस्थापन करावे. अभ्यासक्रमातील कोणत्या घटकाला किती महत्त्व, त्यासाठी कोणत्या लेखकाची कोणती पुस्तके कशी वाचावी, याचे नियोजन गरजेचे आहे. अथक परिश्रमच विद्यार्थ्यांना यशाच्या जवळ घेऊन जाईल.

सेट-नेट मार्गदर्शनसारख्या कार्यशाळांत विद्यार्थ्यांनी सहभागी झाल्यास हमखास यशाचे मंत्र व फॉर्म्युला मिळेल. अशा प्रकारच्या मार्गदर्शन कार्यशाळा भविष्यातही घेण्यास शिवाजी विद्यापीठाचे दूर शिक्षण केंद्र तत्पर असेल. सकाळच्या सत्रामध्ये डॉ. मारुती लोंढे म्हणाले, सेट-नेटसारख्या परीक्षेमध्ये आशयापेक्षा तंत्र पद्धतीला सर्वात जास्त महत्त्व आहे आणि ते विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे गरजेचे आहे. गणितांच्या उदाहरणांना न घाबरता त्याचा सराव केला म्हणजे गणितातील जादू वा गंमती विद्यार्थ्यांचा अभ्यासातील ताण कमी करतात. डॉ. के. बी. पाटील म्हणाले, सेट-नेट संदर्भातील कार्यशाळा म्हणजे परीक्षेची पूर्ण तयारी नसून तर ती केवळ सुरुवात आहे.

संरावातील सातत्यच विद्यार्थ्यांना सेट-नेट परीक्षेसाठी महत्त्वाचे ठरू शकते. दुपारच्या सत्रामध्ये डॉ. रूपाली संकपाळ म्हणाल्या, मानसशास्त्रीय दृष्टीने शिक्षक स्वत: मानसिकदृष्ट्या सक्षम असल्यास तो विद्यार्थ्यांना सकारात्मक अध्ययनसाठी प्रोत्साहन व प्रेरणा देऊ शकतो. त्याच बरोबर परिमाणकारक अध्ययनासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे. शिक्षणशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. विद्यानंद खंडागळे यांनीही माहिती दिली. कार्यशाळेला दूर शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव कॅप्टन डॉ. एन. पी. सोनजे, दत्तात्रय कमलाकर, डॉ. नितीन रणदिवे, प्रवीण लोंढे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन तेजस्विनी आळवेकर, कु. शुभांगी उदाळे व क्रांती कांबळे यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2018
लोकमत

# 'शिवाजी'च्या विद्यार्थ्यांची विद्यापीठ परिसराला भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** नववर्षाचे स्वागत करताना अनेक व्यक्ती, संस्थांनी वेगवेगळ्या संकल्पना राबविल्या. मात्र, बालवयातच शिवाजी विद्यापीठातील विविध विभागांची माहिती करून घेण्याचा संकल्प केलेल्या येथील शिवाजी मराठा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी शनिवारी शिवाजी विद्यापीठ परिसरातील विविध विभागांना भेट देत माहिती घेतली.

कोल्हापुरातील शिवाजी मराठा हायस्कूल ही जुनी शाळा. या शाळेत शिकण्यासाठी येणारे विद्यार्थी हे प्रामुख्याने शहरातील गरीब आणि दुर्बल घटकातील. त्यामुळे त्यांच्या जाणिवा समृद्ध करण्यासाठी तसेच त्यांना दैनंदिन घडामोडींचा परिचय करून देण्यासाठी या शाळेतील उपक्रमशील शिक्षक नेहमीच धडपडत असतात. या शाळेमार्फत आतापर्यंत या विद्यार्थ्यांना नवनवीन संकल्पनांच्या माध्यमातून शाळाबाह्य शिक्षण देण्याचा नावीण्यपूर्ण आणि अनोखा प्रयत्न सातत्याने सुरू असतो. याचाच एक भाग म्हणून गेल्याच महिन्यात बालस्नेहसंमेलनाचे आयोजन केले होते. मुख्याध्यापक तोडकर, कलाशिक्षक मिलिंद यादव यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमामध्ये सहभागी झालेल्या शाळेतील या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठातील विविध विभागांना भेटी देऊन नववर्षाचे अनोखे स्वागत केले.

नवीन वर्षात नवीन संकल्पना घेऊन या शिवाजी मराठा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर संग्रहालय, प्राणिशास्त्र विभाग आणि वनस्पतीशास्त्र विभागांना भेट देऊन तेथील अभ्यासक्रम जाणून घेण्याचा प्रयत्न केला. देशातील विविध भागांतून आणून लावलेल्या वनस्पती विद्यार्थ्यांना पाहता आल्या.

10 JAN 2018
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जि.प.चे विद्यार्थी पाहणार अवकाश संशोधन केंद्र

## विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात झालेल्या मुलाखतीत ४८ विद्यार्थ्यांची निवड; २० ते २२ फेब्रुवारी दरम्यान जाणार तिरूवनंतपुरमला सहल

प्रतिनिधी
कोल्हापूर

पृथ्वीवर अफाट पसरलेल्या अवकाशाचे कुतुहल सर्वांनाच असते. अवकाशातील ग्रह–ताऱ्यांबद्दल बालचमुंना अनेक प्रश्न असतात. जिज्ञासेतून निर्माण झालेले प्रश्न सोडवण्यासाठी ते उत्सुक असतात. तासूनतास ते यासाठी निरीक्षणही करत असतात. हेच निरीक्षण आणखी जवळून करण्याची संधी आता कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांना मिळाली आहे. जिल्हा परिषदेने अभिनव उपक्रम राबवत केरळ येथील तिरुवनंतपुररम येथील विक्रम साराभाई अवकाश संशोधन केंद्र पाहण्यची संधी उपलब्ध करुन दिली आहे. यासाठी ४८ विद्यार्थ्यांची निवड केली आहे.



कोल्हापूर : जिल्हा परिषदेच्या वतीने तंत्रज्ञान अधिविभागातील आयोजित मुलाखतीला आलेल्या विद्यार्थ्यांना मार्गर्शन करताना जि. प. प्राथमिक शिक्षणाधिकारी सुभाष चौगुले. सोबत डॉ. ए. के. शर्मा, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. के. एम. गरडकर, डॉ. एस. ए. संकपाळ, डॉ. एस. एस. कांबळे, डॉ. एन. एस. चव्हाण, डॉ. ए. ए. गुरव, बी. एम. कासार.

भारतीय अंतराळ संशोधनाचे पितामह आणि अंतराळ संशोधनशास्त्राचे शिल्पकार म्हणून विक्रम साराभाई यांना ओळखले जाते. तिरूवनंतपुरम येथे त्यांच्या नावाने अवकाश संशोधन केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. येथे अंतराळ संशोधनाचे विविध विभाग कार्यरत असून तेथे देशातील नामवंत संशोधक आंतराळातील अनभिज्ञ गोष्टी उलगडण्याचा प्रयत्न करत असतात. विद्यार्थ्यांना अंतराळ संशोधनाची मुलभूत माहिती व्हावी. त्यांच्यामध्ये संशोधनाबद्दल कुतुहल निर्माण व्हावे. यासाठी जि.प.च्या वतीने या उपक्रमाचे आयोजन केले आहे. दि. २० ते २२ फेब्रुवारी या कालावधीमध्ये ही अभ्यास सहल होणार आहे. डिसेंबरमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील १२ तालुक्यांमध्ये तालुकास्तरीय निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. या निबंध स्पर्धेतून १४४ विद्यार्थ्यांनी मुलाखतीसाठी निवड करण्यात आली. डॉ. ए. के. शर्मा, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. के. एम. गरडकर, डॉ. एस. ए. संकपाळ, डॉ. एस. एस. कांबळे, डॉ. एन. एस. चव्हाण या तज्ज्ञांनी या विद्यार्थ्यांची ५० गुणांची मुलाखत घेतली. यातून प्रत्येक तालुक्यातून २ मुले व २ मुलींची निवड करण्यात आली. एकूण ४८ विद्यार्थी १२ अधिकारी, शिक्षक व कर्मचारी अशी ६० जाणांची सहल जाणार आहे. या विद्यार्थ्यांना हवाई प्रवासाचाही प्रत्यक्ष अंनुभव मिळणार आहे. परतीच्या प्रवासात बेंगलोर येथील भारतीय विज्ञान केंद्राच्या कामकाजाची माहिती घेणार आहेत, अशी माहिती जि.प.चे प्राथमिक शिक्षणाधिकारी सुभाष चौगुले यांनी दिली. समन्वयक डॉ. ए. ए. गुरव यांनी काम पाहिले. यावेळी जि. प. उपशिक्षणाधिकारी बी. एम. कासार, सर्व विस्तार अधिकारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2018
तरुण भारत

# शहाजी महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ व शहाजी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने शहाजी महाविद्यालयामध्ये शुक्रवार १२ रोजी राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये 'आजच्या संदर्भात वैचारिक साहित्याची प्रस्तुतता" या विषयावर विचायमंथन होणार आहे. यावेळी डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. जयदेव डोळे, डॉ. ज. रा. दाभोळे, किशोर बेडकिहाळ, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. विनय हर्डीकर मार्गदर्शन करणार आहेत. अभ्यासकांच्या संशोधनपर संग्रहाचे ई–जर्नल्सच्या स्वरुपात प्रकाशन होणार आहे. यावेळी शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, मानद सचिव विजयराव बोंद्रे, डॉ. डी. आर. मोरे, शहाजी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एकनाथ काटकर, डॉ. राजन गवस, डॉ. शिवकुमार सोनाळकर आदी उपस्थित राहणार आहेत.

10 JAN 2018
महाराष्ट्र टाईम्स

# आंतरविद्यापीठ क्रिकेटमध्ये नाइट कॉलेज अजिंक्य

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आंतरविद्यापीठ क्रिकेटच्या अंतिम सामन्यात नाइट कॉलेजच्या संघाने अजिंक्यपद पटकावले. त्यांनी महावीर कॉलेजच्या संघाचा तीन गडी राखून पराभव केला. स्पर्धेमध्ये नाइट कॉलेजचा संघ प्रथमच सहभागी झाला होता. विजय संघात चेतन नार्वेकर-कर्णधार, वैभव पाटील, रणजीत निकम, विश्वजीत जगताप, हर्षद जगताप, हर्षद पठाण, आशुतोष अंबपकर, तुषार नाईक, मंजूनाथ यादव, प्रथमेश दिवेकर, मुस्तफा देसाई, साहील पाटील, प्रवीण गावडे, कुणाल पाटील, शुभम पाटील, वीरेनसिंह रजपूत यांचा समावेश होता. विजयी खेळाडूंचे संस्था अध्यक्षा रजनीताई मगदूम उपाध्यक्ष प्रसाद कामत, संचालक ॲड. व्ही. एन. पाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, यांनी अभिनंदन केले. शारीरिक शिक्षण संचालक डॉ. सुरेश फराकटे व प्रा. योगेश मांगोरे-पाटील यांनी संघास मार्गदर्शन केले.